# डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को–ऑप बँक लि.,

## मुख्य कार्यालय, इर्विन चौक, अमरावती

E-mail : pucbho@rediffmail.com दुरध्वनी क्र. (0721) 2663701, 2660872


## स्थावर मालमत्तेची निविदेंव्दारे विक्रीची नोटीस

**दी सिक्युरीटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल अॅसेटस् अँण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरीटी इन्ट्रेस्ट अॅक्ट 2002 चे कलम 13(12) व सिक्युरीटी इन्टरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स् 2002 अंतर्गत**

ज्याअर्थी, कर्जदार, **श्री. चंद्रशेखर रामचंद्र बहुरुपी** ह्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को–ऑप बँक लि., मुख्य कार्यालय, इर्विन चौक, अमरावती, शाखा वरुड, ह्यांचेकडून मालमत्तेच्या तारणावर (OD Ag. Property) रु.19,00,000/- (अक्षरी रु. एकोणविस लक्ष फक्त) घेतलेले आहे आणि त्या कर्जाच्या परतफेडीकरीता हमी म्हणून **श्री. चंद्रशेखर रामचंद्र बहुरुपी** यांचे नावे असलेली खालील वर्णनाची स्थावर मालमत्ता बँकेकडे गहाण म्हणून दिलेली असून बँकेने नोटीस पाठवूनही थकीत रकमेचा भरणा कर्जदाराने मुदतीचा आत केला नाही म्हणून खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेचा ताबा बँकेतर्फे अधिकृत अधिकारी ह्यांनी दिनांक 20/11/2025 रोजी घेतलेला आहे.

दी सिक्युरीटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल अॅसेटस् अँण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरीटी इन्ट्रेस्ट अॅक्ट 2002 चे कलम 13(12) व सिक्युरीटी इन्ट्रेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स् 2002 चे कलम 8, 9 अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारावरून खालील सही करणार अधिकृत अधिकारी खालील वर्णनाचे गहाण स्थावर मालमत्तेची निविदेव्दारे विक्री करण्याकरीता जाहीरात देण्यात येत आहे.

Security Interest (Enforcement ) Rules 2002 च्या नियम 8 (6) अन्वये थकीत कर्जदार, **श्री. चंद्रशेखर रामचंद्र बहुरुपी** यांना सदर जाहिरातीव्दारे थकीत कर्ज, व्याज व इतर वसूलपात्र शुल्क यांचा भरणा करण्यासाठी जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून 30 दिवसांची अंतीम नोटीस देण्यात येत आहे.

बँकेने खालील गहाण स्थावर मालमत्ता ज्या ठिकाणी आहे आणि ज्या परिस्थितीत आहे तशीच विक्री करण्याकरीता सिलबंद निविदा मागविण्याचे ठरविले आहे. कर्ज रक्कम रुपये 23,31,494/- (अक्षरी रु. तेवीस लक्ष एक्कतीस हजार चारशे चौऱ्यांन्नव फक्त) अखेर अधिक पुढील व्याज व ईतर वसूलपात्र शुल्क येणे बाकी असलेल्या रकमेच्या वसुलीकरीता निविदा मागविण्यात येत आहे. ज्या कुणास खालील वर्णन केलेली स्थावर मालमत्ता विकत घ्यावयाची असेल त्यांनी आपली निविदा, अधिकृत अधिकारी, डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को–ऑप बँक लि., वसुली विभाग, मुख्य कार्यालय, इर्विन चौक, अमरावती या पत्यावर सिलबंद पाकीटामध्ये ज्यावर कर्जदाराचे नावांसह स्थावर मालमत्तेबाबत निविदा असे स्पष्टपणे नमुद करावे. सोबत अनामत रक्कम रु.1,00,000/- चा ड्राफ्ट / पेऑर्डर प्रति निविदेसाठी जो डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को–ऑप बँक लि., अमरावती च्या नावाने असलेला दिनांक 13/07/2026 पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावी.

**सिलबंद निविदा मंगळवार, दिनांक 14/07/2026 रोजी दुपारी 12:00 वाजता, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को–ऑप बँक लि., अमरावती, वसुली विभाग, अमरावती येथे उघडण्यात येतील.** ज्या खरेदीदाराची निविदा जास्त रकमेची असेल त्यास खरेदी किमतीच्या 25% रक्कम त्याच दिवशी बँकेत जमा करावी लागेल. जर त्याने तसे केले नाही. तर अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. बाकी राहीलेली उर्वरीत 75% रक्कम विक्री कायम करण्याच्या तारखेपासून 15 दिवसांचे आत बँकेत जमा करावी लागेल. वेळेवर रक्कम देण्यास कसूर केल्यास स्थावर मालमत्ता पुन्हा विक्रीस काढण्यात येईल व अनामत म्हणून दिलेली रक्कम परत मिळणार नाही आणि ती जप्त करण्यात येईल व पून्हा विक्रीमध्ये किंमत न आल्यास फरकाची रक्कम कसूरदाराकडून वसुल करण्यात येईल. विक्री कायम केल्यानंतर व पूर्ण रकमेचा भरणा केल्यानंतर बँकेतर्फे अधिकृत अधिकारी, परिशिष्ठ 5 मध्ये दिलेल्या नमून्यात सेल सर्टिफिकेट खरेदीदाराचे नावाने करून देतील परंतू वरील अट पूर्ण झाल्यानंतरच सेल सर्टिफिकेट देण्यात येईल.

**गहाण स्थावर मालमत्तेचा तपशील**

सर्व्हे नं.496/3, 497/2, 497/4 अंतर्गत असलेला खुला प्लॉट नं.66 वरील मालमत्ता क्र.2307 ज्याचे एकुण क्षेत्रफळ 2181 चौ.फुट **श्री. चंद्रशेखर रामचंद्र बहुरुपी** यांचे नावे असलेला खुला प्लॉट, मौजे न.प.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, चर्तुसिमा: पुर्व-खुली जागा, पश्चिम-रस्ता, उत्तर-रस्ता, दक्षिण-प्लॉट नं.67

**वरील गहाणातील मालमत्तेची एकूण राखीव किंमत रु.32,71,000/- आहे.**

निविदेव्दारे विक्री करावयाच्या स्थावर मालमत्तेच्या हक्काविषयी किंवा त्रयस्थ यांनी दावा सांगीतल्यास कोणत्याही अधिकाऱ्यास इतर बोझ्याबाबत किंवा विधीग्राह्यतेविषयी बँकेला कोणतीही माहीती नसून त्याबाबत कोणतीही हमी देण्यांत येत नसून त्याबाबत बँक जबाबदार राहणार नाही.

**अटी व शर्ती –**

1. निविदा सादर करावयाचा छापील अर्ज बँकेचे वसुली विभाग, मुख्य कार्यालय, इर्विन चौक, अमरावती तसेच बँकेची शाखा : वरुड येथून कार्यालयीन वेळेत प्राप्त करता येतील.
2. राखीव किंमती पेक्षा कमी किमतीची निविदा स्विकारल्या जाणार नाही.
3. निविदेच्या कोणत्याही प्रक्रीयेबाबत अंतिम निर्णय, एक किंवा सर्व निविदा स्विकारणे अथवा नाकारणे तसेच लिलाव रद्द करण्याचा अधिकार अधिकृत अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.
4. निविदा धारकाने निविदेसोबत पॅन कार्ड व आधार कार्ड ची छायांकीत प्रत ओळखपत्र व रहिवासी पुरावा म्हणून जोडणे आवश्यक आहे.
5. नियमाप्रमाणे लागू असलेली स्टॅम्प ड्युटी, नोंदणी फी ईत्यादी प्रकारचा खर्च निविदाधारकास करावा लागेल.
6. स्थावर मालमत्तेच्या विक्रीनंतर लागणारा विक्रीकर, वाहतूक खर्च व आवश्यकतेनूसार अन्य खर्च निविदाधारकास करावा लागेल.
7. स्थावर मालमत्तेवर असलेले सरकारी, निमसरकारी, खाजगी स्वरुपाचे इतर कसलेही देणे अथवा बोझे असल्यास ती देण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.
8. विद्युतबिल व इतर प्रकारचे सरकारी कर देण्याची जबाबदारी निविदाधारकांची राहील.
9. स्थावर मालमत्ता ज्या ठिकाणी आहे आणि ज्या परिस्थितीत आहे तशीच विक्री करीता उपलब्ध आहे.
10. लिलावातील संपत्तीचे निरिक्षण दिनांक 15/06/2026 रोजी कार्यालयीन वेळेत करता येईल.
11. विक्रीच्या आणखी अटी व शर्ती असल्यास त्या निविदा उघडण्याच्या वेळेस सांगण्यात येतील.

**ठिकाण : अमरावती**

**दिनांक : 10/06/2026**

**विजय जी. इंगळे**
**अधिकृत अधिकारी**
**डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को–ऑप बँक लि., अमरावती**